# अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई यांचे कार्यालय,

३०२, वेक फिल्ड हाऊस,३ रामजला, ब्रिटानियारेस्टोरंटजवळ, बॅलार्डइस्टेट, फोर्ट,मुंबई-४००००१.

दुरध्वनीक्र.०२२-२२६९४९८५/८४ Email cccfmangrove@mahaforest.gov.in /ccfmmumbai@gmail.com


जा.क्र.कक्ष-१/पाणथळ समिती/ 01 /सन २०२४ - २५ दिनांक:- 01/04/25

प्रति,

१. मा. विभागीय आयुक्त, कोकण विभाग, नवी मुंबई.
२. मा. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई.
३. मा. जिल्हाधिकारी, मुंबई/मुंबई उपनगर/ठाणे/पालघर/रायगड/रत्नागिरी/सिंधुदूर्ग
४. मा. पोलिस आयुक्त, मुंबई/ठाणे.
५. मा.जिल्हा पोलीस अधिक्षक, ठाणे(ग्रामीण)/पालघर/रायगड/रत्नागिरी/सिंधुदूर्ग
६. मा.संचालक, पर्यावरण विभाग, MCZMA
७. मा. आयुक्त / सह आयुक्त महानगरपालिका बृहन्मुंबई/ठाणे/कल्याण-डोंबिवली/मिरा-भाईंदर/वसई-विरार/नवी मुंबई/पनवेल/भिवंडी-निझामपुर, उल्हासनगर)
निजामपूर/ उल्हासनगर (उपआयुक्त व त्यावरील दर्जाचे अधिकारी)
८. मा.अपर आयुक्त, विभागीय आयुक्त यांचे कार्यालय, कोकण विभाग
९. मा.उप वनसंरक्षक (कांदळवन कक्ष), मुंबई.
१०. प्रादेशिक आधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, मुंबई
११. नगर रचना विभागाचे अधिकारी / शहर आणि औद्यौगिक विकास महामंडळ (सिडको)
१२. श्री. स्टॅलिन डी, वनशक्ती (NGO)
१३. डॉ.महेश शिंदीकर, Applied dept.of Science, College of Engineering Pune, Wellesy Road, Shivaji Nagar, Pune.

**विषय :- कोकण पाणथळ तक्रार निवारण समितीच्या ५२ व्या बैठकीचे मंजूर इतिवृत्त.**

**संदर्भ :-** या कार्यालयाचे जा.क्र.कक्ष-१/पाणथळ समिती/२०६/सन २०२४-२५, दिनांक ०७.०२.२०२५ रोजीचे पत्र.

उपरोक्त संदर्भान्वये कोकण पाणथळ तक्रार निवारण समितीची **५२ वी बैठक मंगळवार, दि.२५.०२.२०२५** रोजी **मा. विभागीय आयुक्त तथा अध्यक्ष, कोकण विभाग यांचे अध्यक्षतेखाली** घेण्यात आली होती.

सदर बैठकीचे मंजूर इतिवृत्त आपणास माहिती व पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात येत आहे. तरी, कृपया अवलोकन होणेस विनंती आहे.

सोबत :- वरीलप्रमाणे

(अक्षय गजभिये, भा.व.से.)
सदस्य सचिव,
कोकण पाणथळ तक्रार निवारण समिती
तथा उप वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई

## कोकण पाणथळ तक्रार निवारण समितीची ५२ वी बैठक
## दिनांक २५.०२.२०२५ रोजीचे इतिवृत्त

समितीचे विभागीय आयुक्त तथा अध्यक्ष, कोकण विभाग यांच्या अध्यक्षतेखाली कोकण पाणथळ तक्रार निवारण समितीची मा. विभागीय आयुक्त यांचे दालनात, कोकण विभाग, कोकण भवन, सी.बी.डी.बेलापूर, नवी मुंबई येथे ५२ वी बैठक पार पडली. समितीच्या सदस्य सचिव यांनी उपस्थितांचे स्वागत केले व मा.अध्यक्ष यांच्या अनुमतीने समितीच्या कामकाजास सुरुवात झाली. सदर बैठकीस खालील नमूद अधिकारी व कर्मचारी व्यक्तीश: अथवा व्हि.सी.व्दारे उपस्थित होते.

| अ.क्र. | नाव | पद | कार्यालय |
|---|---|---|---|
| १. | डॉ.विजय सुर्यवंशी, भा.प्र.से. | मा.अध्यक्ष तथा विभागीय आयुक्त | विभागीय आयुक्त, कोकण विभाग, कोकण भवन यांचे कार्यालय |
| २. | श्री.अक्षय गजभिये, भा.व.से. | सदस्य सचिव तथा उपवनसंरक्षक | कांदळवन कक्ष, मुंबई |
| ३. | श्रीमती कांचन ज्ञानोबा पवार | विभागीय वन अधिकारी | मुंबई कांदळवन संधारण घटक, दक्षिण कोकण |
| ४. | श्री. दिपक खाडे | विभागीय वन अधिकारी (व्ही.सी.द्वारे) | मुंबई कांदळवन संधारण घटक, उत्तर कोकण |
| ५. | जिल्हाधिकारी | जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांचे कार्यालय प्रतिनिधी (व्ही.सी.द्वारे) | जिल्हाधिकारी कार्यालय, मुंबई उपनगर |
| ६. | श्री.प्रदीप रा.तावरे | जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांचे कार्यालय प्रतिनिधी (सहा.अधीक्षक) | जिल्हाधिकारी कार्यालय, मुंबई शहर |
| ७. | श्री.दिनेश पैठणकर | जिल्हाधिकारी, ठाणे यांचे कार्यालय प्रतिनिधी (नायब तहसिलदार) | जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे |
| ८. | जिल्हाधिकारी | जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांचे कार्यालय प्रतिनिधी (व्ही.सी.द्वारे) | जिल्हाधिकारी कार्यालय, रत्नागिरी |
| ९. | निवासी उपजिल्हाधिकारी | निवासी उपजिल्हाधिकारी (व्ही.सी.द्वारे) | जिल्हाधिकारी कार्यालय, सिंधुदूर्ग |
| १०. | श्री.सुभाष भागडे | निवासी उपजिल्हाधिकारी (व्ही.सी.द्वारे) | जिल्हाधिकारी कार्यालय, पालघर |
| ११. | निवासी उपजिल्हाधिकारी | निवासी उपजिल्हाधिकारी (व्ही.सी.द्वारे) | जिल्हाधिकारी कार्यालय, रायगड |
| १२. | श्री.निलेश पोतदार | अवर सचिव (व्ही.सी.द्वारे) | पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई |
| १३. | श्री.विशाल मदने | अवर सचिव तथा वैज्ञानिक -२ | पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई |
| १४. | श्री. आनंद बिल्लाडे | कोस्टल ऑफिसर | MCZMA |
| १५. | सौ.गिरिजा देसाई | विभागीय वन अधिकारी (व्ही.सी.व्दारे) | चिपळूण |
| १६. | श्री.स्टॅलिन डी | संचालक (व्ही.सी.व्दारे) | वनशक्ती (NGO) |
| १७. | श्री. अजय वानखेडे | उपयोजनाकार | सिडको |
| १८. | PCC Head Office | PCC, Head Office यांचे प्रतिनिधी (व्ही.सी.द्वारे) | PCC, Head Office |
| १९. | श्री. गोरड, पोलिस निरिक्षक | Police Inspector Security and Cyber Branch (व्ही.सी.द्वारे) | पालघर |
| २०. | पोलिस अधिक्षक (S P) | पोलिस अधिक्षक, कार्यालय याचे प्रतिनिधी (व्ही.सी.द्वारे) | रत्नागिरी |
| २१. | श्री. पुंडलिक मिराशे | सल्लागार (पर्या.) | MIDC, अंधेरी |

| | | | |
|---|---|---|---|
| २२. | श्री. वैभव शेलार | सहा.वास्तुशास्त्रज्ञ, प्रा.का. | MIDC, महापे. |
| २३. | श्री.अजिंक्य पाटील | कक्ष अधिकारी, पर्या | नमुंमुपा |
| २४. | श्री. भरत शिवाजी ढेंबरे | पोलिस उपनिरिक्षक | Commissioner of Police,<br>सुरक्षा शाखा, ठाणे |
| २५. | सौ. स्मिता गुरव | नायब तहसीलदार | अपर तहसीलदार कार्यालय,<br>मिरा भाईंदर |
| २६. | श्री.दिनकर ग. शिळवटे | सहा. पोलिस आयुक्त | मुंबई शहर |
| २७. | श्री. अभिजीत भुजबळ | पोलिस निरीक्षक | सुरक्षा शाखा, रायगड |
| २८. | श्री. शेखर साटम | अधिक्षक | परि.२, कोपरखैरणे |
| २९. | श्री. राजेश कवडे | महसूल सहायक | अपर तहसिलदार,मिरा- भाईंदर |
| ३०. | S.K. Thakore | Dy. Superintendent of Salt | Salt Department |
| ३१. | श्री. सुनिल काठोळे | सहा. आयुक्त | नवी मुंबई महानगरपालिका |
| ३२. | श्री.अनिल वि. पंडित | प्रकल्प कार्यकारी | BOMBAY ENVIRONMENT<br>ACTION GROUP |
| ३३. | श्री. संदीप कोवले | पोलिस उपनिरीक्षक | मिरा भाईंदर, पोलिस आयुक्तालय |
| ३४. | पंकज गोंगे | E. E. (SWM) | |
| ३५. | सुनिल जाधव | नायब तहसिलदार | SDO Office, पनवेल |
| ३६. | पवन चंदक | (SDO) तहसिलदार, पनवेल | SDO Office, पनवेल |
| ३७. | मयुर भुजबळ | ACP, Turbhe | Navi Mumbai, CPO |

टिप :- व्हि.सी.व्दारे उपस्थित सदस्य यांचे नाव व कार्यालय यांचा बोध होत नसल्यामुळे वरीलप्रमाणे नमूद करण्यात आलेले आहे.

| अ.क्र | विषय | करावयाची कार्यवाही |
|---|---|---|
| १ | बैठकीतील चर्चा | • कोकण पाणथळ तक्रार निवारण समितीच्या ५२ व्या बैठकीच्या सुरुवातीस समितीचे सदस्य सचिव यांनी समितीच्या बैठकीस उपस्थितीत सर्व जिल्हाधिकारी, संचालक, पर्यावरण विभाग, उपविभागीय अधिकारी, विभागीय वन अधिकारी, सर्व महानगरपालिकेचे प्रतिनिधी, वरिष्ठ नियोजनकार, सिडको, पोलिस निरीक्षक तसेच, व्हि.सी.व्दारे उपस्थित सर्व अधिकारी व कर्मचारी या सर्वांचे स्वागत केले.<br>• दि.२६ डिसेंबर, २०२४ रोजी झालेल्या कोकण पाणथळ तक्रार निवारण समितीच्या ५१ व्या बैठकीमध्ये मा.अध्यक्ष यांनी कोकण पाणथळ तक्रार निवारण समितीकडे प्राप्त जिल्हानिहाय तक्रारींबाबत संबंधित जिल्हाधिका-यांनी संचालक, पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्याशी समन्वय साधून CRZ, MRSAC आणि वेटलँड ॲटलस नकाशा तपासून केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस सादर करण्याबाबत सूचना दिल्या होत्या. त्याबाबत, समितीचे सदस्य सचिव, यांनी समितीकडे एकूण २० तक्रारी प्राप्त असून जिल्हानिहाय आढावा घेताना विहित नकाशे तपासून केलेल्या कार्यवाहीचा अहवाल अप्राप्त असल्याचे सांगितले.<br>• बैठकीत उपस्थित अशासकीय सदस्य यांनी वडाळा येथील तक्रारींबाबत संबंधित अधिका-यांनी डेब्रिज हटविण्याकरिता काय कार्यवाही केली ? कार्यवाही झाली असल्यास गुन्हे दाखल झाले किंवा कसे ? गुन्हे दाखल झाले असल्यास पोलीसांमार्फत काय कार्यवाही करण्यात आली याबाबत विचारणा केली. तसेच, सदर तक्रारींचे अहवाल विहित नकाशे तपासून सात दिवसात समितीच्या सदस्य सचिवांकडे पाठविण्यात यावे असे सांगितले. त्याचप्रमाणे, अशासकीय सदस्य यांनी ठाणे, जिल्ह्यातील तक्रार क्र. ९२, तक्रारदार श्री. सुनिल अग्रवाल यांच्या तक्रारीबाबत ठाणे, महानगरपालिका यांनी त्यांच्या नकाशांनुसार कोणत्याही प्रकारच्या पाणथळ जागेचे अनुसरण करत नसल्याने सदर तक्रार निकाली काढण्यास हरकत नाही असे सांगितले. तसेच, पालघर जिल्ह्यातील व्हि.सी.व्दारे उपस्थित निवासी उपजिल्हाधिकारी यांनी पालघर जिल्ह्यातील काही तक्रारींमध्ये तथ्य असल्याचे सांगितले व संबंधितांवर पर्यावरण संरक्षण कायदा अंतर्गत गुन्हा दाखल करण्याबाबत सूचना देण्यात आल्याचे सांगितले. तद्‌नंतर, अशासकीय सदस्य यांनी तक्रारींबाबतच्या अहवालांचे अवलोकन होण्याकरिता तक्रारींचे अहवाल समितीच्या पुढील बैठकीपूर्वी सादर होणे अपेक्षित असल्याचे सांगितले.<br>• तसेच, समितीचे सदस्य यांनी मा.अध्यक्ष तथा विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांनी मागील बैठकीत दिलेल्या निर्देशानूसार समितीस CRZ, MRSAC व वेटलँड ॲटलस नकाशे तपासून अहवाल सादर होणे अपेक्षित असल्याचे निर्देश दिल्याचे पुनश्च निर्देशनास आणून दिले जेणेकरुन सदर तक्रारी निकाली काढण्यास सोईचे होणार असल्याचे सांगितले त्यानूसार, बैठकीत उपस्थित जिल्हानिहाय प्रतिनिंधीनी त्याबाबतचा अहवाल समितीस लवकरच सादर करु असे सांगितले. |

| अ.क्र. | जिल्हा | तक्रारी संख्या | संबंधित यंत्रणा | |
|---|---|---|---|---|
| १. | मुंबई, शहर | २ | मुंबई, शहर जिल्ह्यातील उपस्थित प्रतिनिधी यांनी विहित नकाशे तपासून समितीस अहवाल सात दिवसात सादर करण्यात येईल असे सांगितले. | जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांचे कार्यालय |
| २. | मुंबई, उपनगर | २ | मुंबई, उपनगर जिल्ह्यातील उपस्थित प्रतिनिधी यांनी विहित नकाशे तपासून समितीस अहवाल दोन दिवसात सादर करण्यात येईल असे सांगितले. | जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांचे कार्यालय |
| ३. | रायगड | २ | रायगड जिल्ह्यातील उपस्थित प्रतिनिधी यांनी विहित नकाशे तपासून समितीस अहवाल सात दिवसात सादर करण्यात येईल असे सांगितले. | जिल्हाधिकारी, रायगड यांचे कार्यालय |
| ४. | ठाणे | ४ | ठाणे जिल्ह्यातील उपस्थित प्रतिनिधी यांनी विहित नकाशे तपासून समितीस अहवाल सात दिवसात सादर करण्यात येईल असे सांगितले. | जिल्हाधिकारी, ठाणे यांचे कार्यालय |
| ५. | पालघर | ८ | पालघर जिल्ह्यातील उपस्थित प्रतिनिधी यांनी विहित नकाशे तपासून समितीस अहवाल पंधरा दिवसात सादर करण्यात येईल असे सांगितले. | जिल्हाधिकारी, पालघर यांचे कार्यालय |
| ६. | सिंधुदूर्ग | १ | सिंधुदूर्ग जिल्ह्यातील उपस्थित प्रतिनिधी यांनी विहित नकाशे तपासून समितीस अहवाल सात दिवसात सादर करण्यात येईल असे सांगितले. | जिल्हाधिकारी, सिंधुदूर्ग यांचे कार्यालय. |
| एकूण | | १९ | | |

| | | |
|---|---|---|
| १ | मा.अध्यक्ष यांनी दिलेल्या सूचना | • मा. अध्यक्ष तथा विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांनी समितीकडे प्राप्त जिल्हानिहाय तक्रारींबाबत संबंधित जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयाने संचालक, पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्याशी समन्वय साधून CRZ, MRSAC आणि वेटलँड ॲटलस नकाशा तपासून केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीच्या पुढील बैठकीपूर्वी सादर करण्याबाबत सूचना दिल्या.<br>• मा.अध्यक्ष यांनी पाणथळ ठिकाणचे डेब्रिज शास्त्रीयरित्या उचलण्याबाबत महानगरपालिका व इतर स्वायत्त यंत्रणांनी सदर निधीसाठी मा.उच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार सनियंत्रण समितीच्या कामाचा आढावा घेण्यासाठी गठीत करण्यात आलेल्या शासन स्तरावरील मा.अपर मुख्य सचिव (महसूल) यांच्या अध्यक्षतेखालील समितीपुढे सादर करावे लागणार आहे. त्यामुळे, पाणथळचे पुर्नस्थापन (Restoration) करण्यासाठी जिल्हास्तरीय समितीने अंदाजपत्रके तयार करुन त्याकरिता आवश्यक निधीसह (Associated Cost) जिल्हाधिकाऱ्यांनी / महानगरपालिका व इतर स्वायत्त संस्थांनी सर्व बाबी समाविष्ट करुन अंदाजपत्रके समितीच्या पुढील बैठकीपूर्वी सादर करणेबाबत मा.अध्यक्ष यांनी पुनश्च सूचना दिल्या. |

(अक्षय गजभिये, भा.व.से.)
सदस्य सचिव,
कोकण पाणथळ तक्रार निवारण समिती
तथा उपवनसंरक्षक, कांदळवन कक्ष

(डॉ. विजय सुर्यवंशी, भा.प्र.से.)
अध्यक्ष,
कोकण पाणथळ तक्रार निवारण समिती
तथा विभागीय आयुक्त, कोकण विभाग